वर्ष:२
अंक : २२
मे–जून: २००८

|वस्तीवासियांचं मासिक माहितीपत्र |पुणे आवृत्ती | मूल्यः रुपये २ |

# मनोगत

अपलिफ्ट इंडिया असोसिएशन - स्वाभिमान द्वारा

UpLift
Enriching lives of the poor...together

## जाहिरात

केवळ २ महिन्यात आपल्या उज्ज्वल करियरची सुरुवात करा!

दहावी/बारावी पास/ नापास झालेल्यांसाठी सुवर्णसंधी आपलं अवघं जीवन बदलून टाकण्याची!

सोबत: व्यक्तिमत्व विकास व स्पोकन इंग्लिश

कोर्सेसः

- कस्टमर रिलेशन्स आणि सेल्स (१० वी पास)
- हॉस्पिटॅलिटी (हॉटेल इंडस्ट्री) (१० वी पास)
- बेडसाईड पेशंट असिस्टंट (८ वी पास)
- इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी एनेबल्ड सर्विसेस (१२ वी वाणिज्य

पुढील बॅच
२६ जून २००८

त्वरा करा!
मोजक्या जागा शिल्लक!
नोकरीसाठी पूर्ण मदत!

संपर्क:

अन्नपूर्णा परिवार संस्थेमधील व्यवसाय मार्गदर्शक
पत्ता: अन्नपूर्णा वस्तीतील ब्रँच ऑफिस

अधिक माहितीसाठी: फोन करा;
अनिताताई: ९८६०८७३८०६
विद्याताई: ९९७०००२९३८

## संपादकीय...

बघता बघता उन्हाळा संपला मंडळी. पाऊस दारावर येऊन ठेपलाय. शाळा सुरु होतील पोरांच्या आता. हा महिना म्हणजे मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पाया उभारण्याचा महिना. पाया भक्कम तर इमारत भक्कम. पण पाया भक्कम करणं, कुणाच्या हातात?

इमारतीच्या? मुळीच नाही. हे तर गवंड्याचं काम. आणि आपणच मुलांसाठी पाया उभारणारे गवंडी. पाया उभारायचाय, वीट वीट गोळा करायचीय बांधकाम करायला. चांगली बांधायची ना इमारत. मग मागं राहून कसं चालेल?

मी तर जन्मतारखेचा दाखला घेऊन तयार आहे, मुलीचं नाव शाळेत नोंदवायला आणि शेजाऱ्याला पण सांगणार, त्याने नाही विचारले तरी सुद्धा.

मग येणार ना माझ्याबरोबर?

## या अंकात काय वाचाल?

- हरबा व केरबा - दुकानाचे व्यवस्थापन कसे कराल?.....पान २
- आपले आरोग्य आपल्या हाती - अन्न सुरक्षिततेची किल्ली......पान २
- कौटुंबिक - लग्नातील खर्चाचा बोजा......पान ३
- क..क..कायद्याचा - रेशनकार्डावरील आपल्या हक्काचे केरोसीन......पान ३
- योजना - १२ वीतील कॉमर्स व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना खाजगी क्लाससाठी अर्थसाहाय्य ......पान ४
- पेराल ते उगवेल - श्री. अशोक बाबूराव साळवे यांचे यश......पान ४

याशिवाय संपादकीय, महत्वाचे फोन नंबर आणि काही सूचक आकडेवारी जरूर वाचा.

## आकडेवारी

# ३० टक्के

विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहर व जिल्ह्यातही निरक्षरांची संख्या लक्षणीय असल्याची बाब उघडकीस आली आहे. शहर व जिल्ह्यात सध्या २१ लाख ३७ हजार ४८३ एवढे लोक निरक्षर असून निरक्षरतेचे हे प्रमाण ३० टक्के आहे!

सकाळ : ४ एप्रिल २००८

## मदतनीस

**मुक्ता हेल्पलाईन**
२५४६०१०२
एच. आय. व्ही.- एड्स् विषयी शंका अथवा प्रश्न विचारण्यासाठी

**चाईल्ड लाईन**
१०९८
अडचणीत सापडलेल्या मुलांना मदत करण्यासाठी वरील फोनवर संपर्क करा.

**सखी (सुसंवाद संचालित)**
२५५३८४३४
गरजू व पीडित महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी हेल्पलाईन

**स्त्री-आधार केंद्र -**
२४३१४१०४ / २४३१४१०३
गरजू व पीडित महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी हेल्पलाईन

**ह्रदय मित्र प्रतिष्ठान**
२४४५६८४९
ह्रदय शस्त्रक्रियेसाठी मदतीस मार्गदर्शनपर हेलपलाईन

**मुक्तांगण**
२६६९७६०५
व्यसनमुक्ती केंद्र




## दुकानाचे व्यवस्थापन कसे कराल ?

(हरबाच्या किराणा दुकानात गिऱ्हाईक आले आहे)
गिऱ्हाईक : काका, एक रिन द्या पाहू पट्कन.
हरबा : एकच फक्त ?
गिऱ्हाईक : मला तर इथं कुठं मांडणीत एक सुद्धा दिसत नाहीए! संपल्या वाटतं रिनच्या वडी.
हरबा : कशा संपतील ताई. कालच चांगल्या चार डझन रिन आणल्यात..
गिऱ्हाईक : मग संपल्या की काय आज सगळ्या ?
हेरबा : हे काय शोधतोय ना!
(असं म्हणत शोधायला सुरुवात करतो.)
गिऱ्हाईक : नक्की आणल्या होत्या ना ? यादी तपासा नीट आणलेल्या सामानाची!
हेरबा : आपण यादी-बिदी काही करत बसत नाही. सगळं डोक्यात असतं आपल्या!
गिऱ्हाईक : द्या की मग लवकर. उन्हाळ्याचं अर्धा तासच पाणी राहतं नळाला. माझं धुणं राहून जायचं.
हेरबा : व्हील देऊ का ?
गिऱ्हाईक : नको. नको. (गिऱ्हाईक मनाशीच पुटपुटते) उगाच वेळ गेला बाई. धड साबण सुद्धा मिळत नाही या दुकानात वेळेला.
(गिऱ्हाईक निराश होऊन निघून जाते).
हरबा : अरे केरबा, ये ये. कधी आलास गावाहून ?
केरबा : सकाळीच आलो गावाहून आल्या-आल्या तुझी गाठ घ्यावी म्हटलं. पण तू गिऱ्हाईक करत होता तोपर्यंत बसावं म्हटलं.
हरबा : मजेत आहे ना सगळं गावाकडे.
केरबा : हो हो. मजेत आहे सगळं! पण हे सामान अस्ताव्यस्त का पडलंय ?
हरबा : अरे काय सांगू तुला. कालच माल भरलाय. पण वेळेला माल सापडना झालाय. दोन तीन गिऱ्हाईक असंच परत गेलं!
केरबा : हरबा, पहिल्यांदा ते सामान जागच्या जागी व्यवस्थित जाऊ दे. असा पसारा पाहिला तर कोण येईल तुझ्या दुकानात ? दुकान कसं नीटनेटकं, व्यवस्थित मांडायला हवं. तरच तुझ्याकडे गिऱ्हाईक आकर्षित होईल. गिऱ्हाईकाला हवी असलेली वस्तू योग्य वेळी तुला सापडली तरच विक्री होईल ना ? असं गिऱ्हाईकाला सारखं सारखं नाराज केलंस तर कोण येईल तुझ्याकडे परत.
हरबा : ते झालं सगळं पण किती वेळचं या रिन च्या वडी का सापडेनात ? मला वाटतं मी भरल्याच नसतील काल.
केरबा : छान! म्हणजे कोणता माल तू आणला, कुठे ठेवला याचा तुझा तुलाच पत्ता नाही!
हरबा : तसंच होतंय बघ काहीसं.
केरबा : हे बघ हरबा, खरेदीला जाण्यापूर्वी तुला काय खरेदी करायचे आहे, किती खरेदी करायचे आहे, याची यादी तू बनव. म्हणजे तुला ती वस्तू आपल्याकडे आहे की नाही हे कळेल. त्याचबरोबर माल भरल्या भरल्या लगेच दुकानत तो व्यवस्थित जागेवर लावत चल. म्हणजे तुझाही वेळ वाचेल आणि गिऱ्हाईकाचा पण.
हरबा : पटलं बघ केरबा. गिऱ्हाईक समाधानानं परत जाण्यासाठी मी हे सगळं नक्की करेन बघ. पुन्हा एकदा मला मदत केल्याबद्दल धन्यवाद.

लेखनः अंजली कुलकर्णी, स्वाभिमान

**आपले आरोग्य आपल्या हाती**

# अन्न सुरक्षिततेची किल्ली

Courtsey: www.who.int




### स्वच्छता ठेवा

- अन्न शिजवण्यापूर्वी तसेच अन्न वाढताना हात स्वच्छ धुवून घ्या
- अन्न साठवण्याची व अन्न शिजवण्याची भांडी स्वच्छ धुवून घ्या.

**का ?** हात स्वच्छ नसल्यास हाताला लागलेले जीवजंतू अन्नावाटे शरीरात जातात.

### कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगळे ठेवा.

- कच्चे अन्नपदार्थ हाताळण्यासाठी वेगळी सुरी, भांडी वापरा.

**का ?** कच्चे अन्नपदार्थ विशेषत : मांस, पालेभाज्या यांच्यात घातक सूक्ष्मजीवजंतू असू शकतात.

### अन्न नीट शिजवा

- अन्न नीट शिजवा विशेषत : चिकन, मटन, मासे इ.

**का ?** अन्न चांगले शिजवल्याने बरेचसे जीवजंतू मरतात.

### अन्न योग्य तापमानात साठवा

- अन्न दोन तासापेक्षा अधिक काळ सामान्य तापमानात ठेवू नका.

**का** सुक्ष्मजीवजंतू फार कमी काळात वाढतात. परंतु ५ अंशापेक्षा कमी व ६० अंशाच्या वर त्यांची वाढ कमी प्रमाणात होते.

### स्वच्छ पाणी वापरा.

- स्वच्छ पाणी वापरा. गरज भासल्यास पाणी उकळून घ्या.

**का** पाण्यामध्येही घातक जीवजंतू असू शकतात. पाण्यातून अन्नात व अन्नातून ते आपल्या शरीरात प्रवेश करु शकतात.

## कौटुंबिक

### लग्नातील खर्चाचा बोजा

लेखनः नेहा घाणेकर,
स्वाभिमान





विलासराव घरी परतले. त्यांची पत्नी आशा हिने घाईघाईने दार उघडले आणि हातातली बॅग घेतली.
आशा : काय झालं अश्विनीच्या लग्नाचं ?
विलासराव : अगं हो. जरा खुर्चीवर टेकू देत. मुलाचं घराचं चांगलं आहे. आपली अश्विनी त्यांना पसंत आहे पण...
आशा : मानपान, हुंडा, वरदक्षीणा यांचं काय ठरलं ?
विलासराव : ते म्हणाले की आमचं पहिलंच लग्न आहे तेव्हा ५०० माणसं तरी होतील. त्या सर्वांचा खर्च करायचा. झालच तर मुलाला दोन तोळ्यांची चेन आणि अंगठी हवी. हुंडा, वरदक्षिणा वेगळी.
आशा : रितीने काय असेल ते करुन द्यायलाच हवं. मुलीची बाजू पडली ना आपली.
इतका वेळ हा सर्व संवाद शांतपणे ऐकत बसलेली अश्विनी वडिलांना म्हणाली ;
अश्विनी : बाबा, लग्नाचा खर्च नेहमी मुलीकडच्यांनीच का करायचा ? लग्न त्यांच्या मुलाला पण करायचं आहे ना ?
आशा : बाळा, लग्नाचा खर्च मुलीकडच्यांनीच करायचा असा प्रघात आहे कित्येक वर्षांपासून.
अश्विनी : पण प्रघात पाडला कुणी ? आपणच ना ?
आशा : अश्विनी, लहान तोंडी मोठा घास घेऊ नकोस.
अश्विनी : बाबा, तुम्हीच सांगा मी काय चुकीचं बोलले ते. मुलगी जन्माला आली की तिच्या लग्नाची चिंता लागलेली असते. मुलाचे आईबाप मात्र आनंदात पेढे वाटत असतात. मुलगी म्हणजे परक्याचं धन म्हणून जन्मापासून तिच्या लग्नासाठी पैसा जमा करतात. हे असं का ?
अश्विनीच्या आईवडिलांजवळ या प्रश्नाचे उत्तर नव्हते. आपण कधी या प्रश्नावर विचार केलाय ?
मुलगा आणि मुलगी एकत्र येतात आणि विवाह बंधनात बांधले जातात. दोन्ही घरांसाठी आनंददायी असणाऱ्या या प्रसंगाचा खर्च मात्र मुलीकडच्यांनी करायचा ही विषमता का ?
मुलाकडचे व मुलीकडचे हा खर्च वाटून घेऊ शकतील का ? की ज्याच्यामुळे कुणा एकावर खर्चाचा बोजा होणार नाही. लग्नात पैसा उधळण्याची जी चढा-ओढ आपण पहातो ती थांबवता येईल का ? दोघांच्या भविष्यकाळासाठी जर हा पैसा सुरक्षित ठेवला किंवा त्यांना एखादी खोली घेऊन दिली, धंद्याला भांडवल दिले तर पती-पत्नी दोघांचे भविष्य साकारले जाईल. एक दिवसाच्या धूमधडाक्यापेक्षा हा पर्याय चांगला आहे का ?

## क..क..कायद्याचा

### रेशनकार्डावरील आपल्या हक्काचे केरोसीन

राज्यांचा केरोसीनचा कोटा केंद्रशासन प्रमाणित करते. राज्य शासन जिल्ह्यानुसार वितरण करते. केरोसीनचे वितरण करताना कुटुंबाची एल्.पी.जी सिलिंडर धारकता लक्षात घेतली जाते. तुमच्या कुटुबाचा केरोसीनचा वाटा खालील तक्त्यावरुन समजेल.

| वर्ग | | विभाग | केरोसीनचा वाटा (प्रती व्यक्ती) | | कमाल मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| | | | कुटुंबातील व्यक्ती | लिटर | |
| एल्.पी.जी सिलिंडर नसल्यास | | महानगरपालिका हद्दीतील कुटुंबांसाठी | १ | ३ | २४ लिटर |
| | | | २ | ८ | |
| | | | ३ | १० | |
| | | | ४ अथवा त्यापेक्षा जास्त | ३ लिटर प्रती व्यक्ती | |
| एल्.पी.जी सिलिंडर असल्यास | १ सिलिंडर | महानगरपालिका हद्दीतील कुटुंबांसाठी | — | ४ | — |
| एल्.पी.जी सिलिंडर असल्यास | २ सिलिंडर | महानगरपालिका हद्दीतील कुटुंबांसाठी | — | नाही | — |

संदर्भः महाराष्ट्र शासनाची अधिकृत वेबसाईट
http://www.maharashtra.gov.in/english/food/schemes2Show.php#rat

## योजना

लेखन: विजया भोसगे,
स्नेहदीप

### १२ वीतील कॉमर्स व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना खाजगी क्लाससाठी अर्थसाहाय्य

उद्देश: गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या उद्देशाने व त्यांना उच्च शिक्षणास प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने इयत्ता १२ वीतील कॉमर्स व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना खाजगी क्लाससाठी अर्थसाहाय्य केले जाते. यू.सी.डी तर्फे ही योजना राबवली जाते.

| वैशिष्ट्ये | कोणासाठी | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न | कागदपत्रे | अर्ज मिळण्याचे व भरण्याचे ठिकाण | संपर्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ● ११ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यास ६० टक्के गुण आवश्यक<br>● सर्व गटांसाठी अर्थ साहाय्य<br>● खाजगी क्लाससाठी १०, ००० रूपयांपर्यंत अर्थसाहाय्य<br>● एकाच कुटुंबातील दोन पाल्यही योजनेचा लाभ घेऊ शकतात. | → इयत्ता १२ वी तील कॉमर्स व सायन्स शाखेच्या विद्यार्थ्यांनी<br>→ म.न.पा. हद्दीतील विद्यार्थ्यांसाठी<br>→ कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी<br>→ एकाच कुटुंबातील जास्तीत जास्त दोन पाल्यांना योजनेचा लाभ होऊ शकतो.<br>→ एकाच प्रयत्नात ११ वी उत्तीर्ण होणे आवश्यक | ११ वी उत्तीर्ण विद्यार्थी | → एकाच प्रयत्नात ११ वी उत्तीर्ण<br>→ विद्यार्थ्यास ६० टक्के गुण आवश्यक | रु. १, ००, ००० च्या आत. | → रेशनिंग कार्ड (साक्षांकित प्रती)<br>→ ११ वी गुणपत्रिका प्रत<br>→ शेजार समूह गटाचा उत्पन्नाच्या दाखल्याबाबतचा ठराव<br>→ झोपडपट्टी व्यतिरिक्त रहात असेल तर मागील वर्षाचा मा. तहसीलदार यांच्याकडील उत्पन्नाचा दाखला. | → वस्तीपातळीवरील गटप्रमुख<br>→ गटस्वयंसेविका<br>→ समूह संघटिका<br>→ एस्. एम्. जोशी हॉल. | एस्. एम्. जोशी सभागृह. दारूवाला पूल, पुणे. फोन :२६३३६२४९ |

## आपला अभिप्राय या कात्रणातून आमच्यापर्यंत पोहोचवा

अभिप्राय - मे-जून: २००८

संस्था:

शाखा क्रमांक:

या महिन्यातील सर्वात जास्त आवडलेला लेख:

आपल्या रोजच्या जीवनात मनोगत मध्ये सांगितलेली कोणती गोष्ट आपण अंमलात आणाल ?

तुम्हाला एखाद्या विषयाची माहिती हवी असल्यास तो विषय नमूद करा:

आपले नाव:

वय:

घरातील सदस्यांची संख्या:

या प्रश्नांव्यतिरिक्त तुमच्या सूचना, तुमच्या समस्या, तुम्ही लिहिलेले लेख, कविता या पत्त्यावर जरुर पाठवा:

- संपर्क :१४ लॅंडमार्क अपार्टमेंट, बी. जे. रोड, साधू वास्वानी चौक. पुणे४११००१.
- फोन : ०९१ (२०) २६०५ १०१३
- ईमेल : upliftindiaatul@gmail.com

## पेराल ते उगवेल

### श्री. अशोक बाबूराव साळवे, जनता वसाहत



सहा वर्षापूर्वी श्री. साळवे यांनी स्क्रीन प्रिंटिंगचा व्यवसाय सुरु केला. पहिली तीन वर्ष व्यवसाय जरी सुरळित चालू होता तरी हवी तशी प्रगती होत नव्हती. एक दिवस शेजाऱ्याने श्री. साळवे यांना पर्वती स्वयंरोजगार संस्थेच्या लघुकर्जपुरवठा प्रकल्पाची माहिती दिली. प्रकल्पाची नीट माहिती वस्तीतील संस्थेच्या शाखाकार्यालयातून घेतल्यावर श्री. साळवे यांनी व्यवसाय वाढीसाठी कर्ज घेण्याचा निर्णय घेतला. महिन्याभरातच त्यांना १५०० रु. चे कर्ज उपलब्ध झाले.

पहिल्या कर्जातून त्यांनी व्यवसायासाठी लागणारे कागद, व्हिजिटिंग कार्ड, रंग, शाई इत्यादी साहित्य आणले. व्यवसायात वाढ झाल्यामुळे त्यांनी पहिले कर्ज सहज फेडले व पुढच्या कर्जासाठी अर्ज केला. पुढील कर्जातून त्यांच्या व्यवसायास अधिक गती मिळाली. आता त्यांनी १२००० रुपयांचे चौथे कर्ज घेतले आहे. कर्जाचे हप्ते नियमित फेडण्याबरोबरच बचतीचीही सवय त्यांना लागली आहे.

पर्वती स्वयंरोजगार संस्थेच्या लघुकर्जपुरवठा प्रकल्पामुळे माझी आर्थिक परिस्थिती बळकट झाली त्याचप्रमाणे माझा आत्मविश्वासही वाढला, आपली तीन मुले व पत्नीकडे बघत श्री. साळवे अभिमानाने सांगतात.

कुटुंबाच्या आरोग्याचे महत्त्वही श्री. साळवे यांना पर्वतीच्या आरोग्यनिधी प्रकल्पामुळे कळले. अडचणीच्या वेळी योग्य उपचार व मार्गदर्शन मिळावे म्हणून त्यांनी आरोग्यनिधीचे सभासदत्व घेतले आहे.

श्री. साळवे यांच्या भावी वाटचालीकरिता मनोगत परिवारातर्फे शुभेच्छा!

लेखन: क्रिस्टिन,
स्वाभिमान